# एम.ए., एम.कॉम.ला प्रवेश अर्जास मुदतवाढ

## लॉकडाउनमुळे ५ सप्टेंबरपर्यंत संधी

कोल्हापूर, ता. २५ : शिवाजी विद्यापीठाच्या २०२०-२१ शैक्षणिक वर्षातील एम.ए., एम.कॉम. व एल.एल.एम. भाग १ अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी अर्ज भरण्याची मुदत ५ सप्टेंबरपर्यंत वाढविली आहे. ही मुदत १० ऑगस्टपर्यंत होती.

कोविड-१९ चा प्रादुर्भाव व लॉकडाउन असल्याने अनेक विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमांसाठी ऑनलाईन अर्ज भरता आले नाहीत. त्यामुळे त्यांनी अभ्यासक्रमासाठी ऑनलाईन प्रवेश अर्ज भरण्यास मुदतवाढ मिळणेबाबत प्रशासनाकडे मागणी केली. त्याची दखल घेतली. ज्या विद्यार्थ्यांनी अद्याप एम.ए., एम.कॉम. व एल.एल.एम. भाग १ अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज केलेले नसतील त्यांनी विद्यापीठाच्या http://www.unishivaji.ac.in/mscadmission/admission-२०२० लिंकवर जाऊन ऑनलाईन अर्ज भरावेत. २०२०-२१ शैक्षणिक वर्षात विद्यापीठ अधिविभागात भाग २ व भाग ३ अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया संबंधित अधिविभागामार्फत सुरू केली आहे. संबंधित विद्यार्थी-विद्यार्थिनींनी अधिविभागाशी दूरध्वनी अथवा ईमेलद्वारे संपर्क साधून प्रवेश निश्चित करावा. प्रवेशासाठी अधिविभागात प्रत्यक्ष उपस्थित राहण्याची आवश्यकता नाही, असे पदव्युत्तर प्रवेश विभागाने कळविले आहे.

# नवे शैक्षणिक धोरण महत्त्वाकांक्षी

## डॉ. साळुंखे; शिवाजी विद्यापीठ रवळनाथ हौसिंग फायनान्सतर्फे वेबिनार



**डॉ. माणिकराव साळुंखे**

कोल्हापूर, ता. २५ : केंद्र सरकारने जाहीर केलेले नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण देशातील सर्व प्रकारच्या शिक्षणामध्ये सुसूत्रता आणण्याचा प्रयत्न करणारे आहे. नवे धोरण खरोखरच महत्त्वाकांक्षी स्वरूपाचे असले तरी प्रत्यक्षात अंमलबजावणी कशी करणार, यावर तिचे भवितव्य अवलंबून आहे, असे प्रतिपादन पुण्याच्या भारती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या ॲकॅडमी फॉर ॲकॅडमिक ॲडमिनिस्ट्रेशन व रवळनाथ हौसिंग फायनान्स (मल्टीस्टेट, गडहिंग्लज, कोल्हापूर) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२०' विषयावरील राष्ट्रीय वेबिनारमध्ये प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. प्रभारी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर अध्यक्षस्थानी होते.

कुलगुरू डॉ. साळुंखे म्हणाले, "शिक्षणाचे बहुस्तरीय विस्तारीकरण, ज्ञानवर्धन, संशोधन अशा सर्वच स्तरांवर नवे शैक्षणिक धोरण फार मूलगामी स्वरुपाचे आहे. देशातील सर्व प्रकारच्या शिक्षणामध्ये सुसूत्रता आणण्याचा प्रयत्न यामध्ये करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे शिक्षणाच्या आणि ते देणाऱ्या सर्व व्यवस्थांच्या सक्षमीकरणाचाही प्रयत्न आहे. आयआयटी, आयआयएम



यांसारख्या केंद्रीय संस्थांच्या तोडीचे विद्यार्थी मनुष्यबळ सर्व प्रकारच्या शिक्षण संस्थांतून निर्माण होईल, याकडेही या धोरणाचा कटाक्ष असल्याचे दिसून येते."

नवी दिल्ली येथील 'निपा' संस्थेच्या शैक्षणिक धोरण विभागाचे प्रमुख प्रा. अविनाश सिंग म्हणाले, "नव्या शैक्षणिक धोरणाने उच्चशिक्षणातील प्रवेशाचा टक्का ५० टक्केपर्यंत (जीईआर) नेण्याचे लक्ष्य निर्धारित केले असताना त्याची पूर्तता कशा प्रकारे करावयाची, याचा विचार साकल्याने केला जाणे अपेक्षित आहे."

आनंद मापुस्कर यांनी नवे शैक्षणिक धोरण आणि महाराष्ट्र विद्यापीठ कायदा यांचा तुलनात्मक आढावा घेतला. 'एम-फुक्टो'च्या डॉ. तपती मुखोपाध्याय यांनी सध्याची शिक्षणव्यवस्था खूप स्तरित स्वरूपाची आहे. हे स्वरुप बदलण्याचे आव्हान आपल्यासमोर आहे, असे सांगितले. एम. एल. चौगुले यांनी स्वागत, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी प्रास्ताविक केले. ॲकॅडमी फॉर ॲकॅडेमिक ॲडमिनिस्ट्रेशनचे समन्वयक डॉ. एस.टी. कोंबडे यांनी आभार मानले.

पुढारी

# एम.ए., एम.कॉम., एल.एल.एम. भाग १ प्रवेशासाठी मुदत वाढ

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षातील एम.ए., एम.कॉम. व एल.एल.एम. भाग १ अभ्यासक्रमाच्यां प्रवेशासाठी प्रवेश अर्ज भरण्याची मुदत ५ सप्टेंबर पर्यंत वाढवण्यात आली आहे. यापूर्वी ही मुदत दि. १० ऑगस्ट २०२० पर्यंत होती.

कोव्हिड-१९ चा प्रादुर्भाव व लॉकडाऊन असल्यामुळे बऱ्याच विद्यार्थ्यांना या अभ्यासक्रमांसाठी ऑनलाईन अर्ज करता आलेले नाहीत. त्यामुळे बऱ्याच विद्यार्थ्यांनी या अभ्यासक्रमासाठी ऑनलाईन प्रवेश अर्ज भरण्यास मुदतवाढ मिळण्याबाबत कार्यालयाकडे विनंती केली आहे.

या अनुषंगाने कोव्हिड-१९ चा प्रादुर्भाव व लॉकडाऊनमुळे संबंधित विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये म्हणून शिवाजी विद्यापीठ प्रशासनाने सन २०२०-२०२१ या शैक्षणिक वर्षातील एम.ए., एम.कॉम. व एल.एल.एम. भाग १ या अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी ऑनलाईन प्रवेश अर्ज भरण्याची मुदत दि. ५ सप्टेंबर २०२० पर्यंत वाढविण्यास मान्यता दिली आहे. तरी ज्या विद्यार्थ्यांनी अद्याप एम.ए., एम.कॉम. व एल.एल.एम. भाग १ या अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज केलेले नसतील त्यांनी विद्यापीठाच्या http://www.unishivaji.ac.in/mscadmission/admission-2020 या लिंकवर जाऊन ऑनलाईन अर्ज भरावेत.

तसेच सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षांमध्ये विद्यापीठ अधिविभागात भाग २ व भाग ३ या अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया संबंधित अधिविभागामार्फत सुरू करण्यात आली आहे. संबंधित विद्यार्थी/ विद्यार्थिनींनी याबाबत आपल्या अधिविभागाशी दूरध्वनी अथवा ई-मेलद्वारे संपर्क साधून आपला प्रवेश निश्चित करावा. प्रवेशासाठी अधिविभागात प्रत्यक्ष उपस्थित राहण्याची आवश्यकता नाही, असे पदव्युत्तर प्रवेश विभागाने कळविले आहे.

पुण्यनगरी

# नवे शैक्षणिक धोरण सुसूत्रता आणणारे : डॉ. साळुंखे

## शिवाजी विद्यापीठातर्फे 'नव्या शैक्षणिक धोरणा'बाबत राष्ट्रीय वेबिनार

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

केंद्र सरकारने जाहीर केलेले नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण देशातील सर्व प्रकारच्या शिक्षणामध्ये सुसूत्रता आणण्याचा प्रयत्न करणारे आहे. नवे धोरण खरोखरीच अत्यंत महत्त्वाकांक्षी स्वरुपाचे असले तरी प्रत्यक्षात आपण त्याची अंमलबजावणी कशी करणार, यावर त्याचे भवितव्य अवलंबून आहे, असे प्रतिपादन पुण्याच्या भारती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाची ॲकॅडमी फॉर ॲकॅडमिक ॲडमिनिस्ट्रेशन व श्री रवळनाथ हौसिंग फायनान्स, गडहिंग्लज यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२०' या विषयावरील राष्ट्रीय वेबिनारमध्ये प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. प्रभारी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर अध्यक्षस्थानी होते.

कुलगुरू डॉ. साळुंखे म्हणाले, शिक्षणाचे बहुस्तरीय विस्तारीकरण, ज्ञानवर्धन, संशोधन अशा सर्वच स्तरांवर नवे शैक्षणिक धोरण मूलगामी स्वरुपाचे आहे. देशातील सर्व प्रकारच्या शिक्षणामध्ये सुसूत्रता आणण्याचा प्रयत्न यामध्ये करण्यात आला आहे.

नवी दिल्लीतील 'निपा' संस्थेच्या शैक्षणिक धोरण विभागाचे प्रमुख प्रा. अविनाश सिंग म्हणाले, नव्या शैक्षणिक धोरणाने उच्चशिक्षणातील प्रवेशाचा टक्का ५० टक्केपर्यंत (जीईआर) नेण्याचे लक्ष्य निर्धारित केले असताना त्याची पूर्तता कशा प्रकारे करावयाची, याचा विचार साकल्याने केला जाणे अपेक्षित आहे. देशातील विद्यापीठे ही आजही मुख्यतः शिकविणारीच आहेत. तेथील संशोधनाचे प्रमाण तुलनेत कमीच आहे. परदेशी विद्यापीठांशी तुलना केली असता तर हे प्रमाण जाणवण्याइतके अल्प आहे.

आनंद मापुस्कर म्हणाले, नव्या शैक्षणिक धोरणाचे महाराष्ट्र विद्यापीठ कायद्याशी अनेक बाबतीत साम्य आहे. त्यामुळे या धोरणाच्या अंमलबजावणीमध्ये राज्यात कोणत्याही प्रकारची अडचण येणार नाही. 'एम-फुक्टो'च्या डॉ. मुखोपाध्याय म्हणाल्या, सध्याची शिक्षण व्यवस्थेचे स्वरुप बदलण्याचे आव्हान आपल्यासमोर आहे. देशात आजघडीला ९९३ विद्यापीठे, ५० हजार महाविद्यालये आहेत. १०,७०० स्वायत्त संस्था आहेत. या सर्वांना मिळून देशातील उच्चशिक्षणाचे प्रतल समृद्ध करावयाचे आहे.

वेबिनारचे स्वागत एम. एल. चौगुले यांनी केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी प्रास्ताविक, तर विद्यापीठाच्या ॲकॅडमी फॉर ॲकॅडेमिक ॲडमिनिस्ट्रेशनचे समन्वयक डॉ. एस. टी. कोंबडे यांनी आभार मानले.